साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ४६ ● मंगळवार, दि. १ ते ८ एप्रिल २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू


# संजिवनी ममता हॉस्पिटलतर्फे मोफत मेगा आरोग्य तपासणी शिबिर

**रिसोड (वार्ताहर) – संजिवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरतर्फे नागरिकांसाठी ५ व ६ एप्रिल रोजी मोफत मेगा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.सदर शिबीर उत्तमचंदबगडिया कला व वाणिज्य महाविद्यालय, रिसोड येथे सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन मिळणार आहे.**

शिबिरामध्ये प्रामुख्याने सर्व प्रकारचे कर्करोग म्हणजेच कॅन्सर, गुडघ्यांचे व खुब्याचे प्रत्यारोपण म्हणजेच नी व हीप जॉईंट रिप्लेसमेंट, मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातील. सर्व प्रकारचे कॅन्सर मध्ये जसे की, स्त्रियांच्या स्तनाचा कर्करोग म्हणजेच ब्रेस्ट कॅन्सर, प्रगत अख आधारित थर्मल मेमोग्राफी,स्त्रियांच्या गर्भाशयाचा कर्करोग म्हणजेच सर्वाइकल कॅन्सर मध्ये स्त्रियांच्या स्त्रावाचे pap smear द्वारे परीक्षण करण्यात येईल. मुख कर्करोग म्हणजेच तोंडाचा कॅन्सर रुग्णाचे अत्याधुनिक डेंटल व्हॅन मध्ये स्क्रीनिंग द्वारे परीक्षण करण्यात येईल. फुफ्फुसाचा कर्करोग म्हणजे लंग कॅन्सर, घशाचा कॅन्सर,अन्ननलिकेचा कॅन्सर, शरीरावर नवीन गाठ येणे,गुदद्वाराचा कॅन्सर व इतर सर्व प्रकारचे कॅन्सर आजारांचे निदान व उपचार करण्यात येतील. .गुडघ्याचे व खुब्याचे आजार म्हणजेच नी व हिप जॉईंट गुडघ्याचे व खोब्याचे जॉईंट्सच्या आजारांचे तज्ञांद्वारे निशुल्क निदान व मुंबई येथे निशुल्क ऊपचार म्हणजेच प्रत्यारोपण करण्यात येईल. गुडघ्यांमध्ये अथवा खुब्यामध्ये किंवा आसपासच्या भागात लक्षणीय वेदना असल्यास, कडकपणा असल्यास, सूज येत असल्यास व हालचाल होत नसल्यास,एका पायावर उभे राहण्यास अड... असल्यास, चालताना लंगडे... जाणवत असल्यास रुग्णां... तपासणी करून या शिबिराचा लाभ घ्यावा.

शिबिरामध्ये निदान... झालेल्या रुग्णांचे उपचा... संजीवनी ममता आणि मधुसू... अग्रवाल हॉस्पिटल व रिसर्च... मुंबई येथील प्रसिद्ध तज्ञ डॉक्टरांद्वारे करण्यात येणार आहेत. ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन अंतर्गत संजीवनी ममता हॉस्पिटल व रिसर्च सेंटर तर्फे रिसोड शहरामध्ये आतापर्यन्त मेगा २४ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या मध्ये विविध आजारावर असलेल्या ७६५६ रुग्णांची तपासणी करून ३५१४ रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. श्री पुरुषोत्तमजी अग्रवाल,श्री मधूसुधनजी अग्रवाल व श्री मन्नालालजी अग्रवाल हे बंधु स्थानिक ... चे असून आपल्या ...तृभूमीचे ऋण म्हणून ते ...रिसोडकरांची वेगवेगळ्या माध्यमातून सेवा करीत असतात. सामाजिक धार्मिक, आरोग्य व शिक्षण क्षेत्रामध्ये या तिन्ही ...ंचे मोठे योगदान असून ...ड काळात संपूर्ण रिसोड तालुक्यातील नागरिकांचे निशुल्क लसीकरण करून नागरिकांना जीवदान दिल्याने रिसोडकर यांच्याकडे संकटमोचंक म्हणूनच बघतात. श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी मागील आपले मोठे बंधू पुरुषोत्तमजी अग्रवाल यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चार मेगा रोगनिदान शिबिराचे आयोजन केले होते त्याचा बहुसंख्य रिसोडकरांनी लाभ घेतला. मधुसूदनजी अग्रवाल यांनी हे २०२५ वर्ष रिसोड करांच्या आरोग्यासाठी समर्पित केले असून फाउंडेशन च्या वतीने रिसोड शहरात लवकरच बगडिया कॉम्प्लेक्स,गुजरी चौक रिसोड येथे समता सर्वस्व आरोग्य सेवा डायग्नोस्टिक सेंटर सुरु करणार असून ग्रामीण भागातील गरजू जनतेसाठी टेलीमेडिसिन सेवा उपलब्ध असणार आहे.यामध्ये विविध रोगाच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शिबिरात मोफत औषधे, वेदनाशामक उपचार, मल्टीव्हिटॅमिन्स व ब्लड चेकअपसुद्धा केले जाणार आहेत. तसेच उपस्थितांना मोफत पौष्टिक आहार दिला जाणार आहे. आपले आरोग्य, आमची प्राथमिकता असून तुमच्या व कुटुंबाच्या आरोग्यासाठी ही सुवर्णसंधी असून, आरोग्य तपासणीसाठी अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी केले आहे.

# वाशिम ते रिसोड राज्यमार्गावर पांढरे पट्टे कधी दिसणार



**रिसोड :** वाशिम ते रिसोड राज्य क्रमांक ५१ या रस्त्याचे काम संबंधित ठेकेदारामार्फत काम चालू असून या रस्त्यावर खड्डे दुरुस्तीचे काम चालू आहे. दरम्यान या रस्त्यावर अगोदर असलेले पांढरे पट्टे हे वाहन चालवणाऱ्या चालकाला रात्रीच्या वेळेस दिसत होते.

त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनाच्या लाईट मुळे सद्यस्थितीत दिसत नाहीत. सध्या या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम चालू असून अगोदर असलेले पट्टे या नवीन डांबरीकरणाच्या कामामुळे झाकले गेलेले आहेत. त्यामुळे समोरून येणाऱ्या कोणत्याही वाहनाच्या लाईट मुळे आपण रस्त्याच्या मध्यावर आहोत की एका साईडला आहोत हे लवकर कळत नाही, किंबहुना काही वाहने मोटरसायकल असो किंवा चारचाकी वाहने रस्त्यावर पांढरे पट्टे नसल्यामुळे रस्त्याच्या खाली जाऊन अपघात होतात किंवा अनेक वाहने एकमेकांवर पट्टे नसल्यामुळे आढळतात व अपघात होतात. त्यामध्ये कुणाचाही जीव जाऊ शकतो!, करिता लवकरात लवकर वाशिम ते रिसोड राज्यमार्गावर रस्त्याच्या दोन्ही कडेला व मध्यंतरी पांढरा पट्टा लवकरात लवकर मारावा व लोकांचे जीवही वाचतील याबाबतची काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेऊन काम करणाऱ्या कंपनीने सुद्धा या बाबीकडे दुर्लक्ष करू नये लवकरात लवकर हे काम कसे होईल?, याबाबत कार्य हाती घ्यावे अशी या रस्त्यावरील प्रवाशांची मागणी आहे. व सोबतच रस्त्याच्या कडा सुद्धा मुरूमाने काही जागेवर भरणे गरजेचे आहे. श.प्र.

# रिसोड शहरातील युवक युवतींकरीता पीएम इंटर्नशिप योजनेअंतर्गत सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा

## ■ रिसोड न.प. मुख्याधिकारी सतिश शेवदा यांचे आवाहन ■

रिसोड - प्रधानमंत्री इंटर्नशिप योजने अंतर्गत, देशातील ५०० कंपन्यामध्ये एक कोटी युवक युवतींना इंटर्नशिपची संधीउपलब्ध करून दिल्या जात आहेत या योजनेतर्गत युवक युवतींना व्यावहारिक अनुभव मिळवून त्यांना उद्योग क्षेत्रात मूल्यवान एक्सपोजर मिळवून रोजगाराच्या संधी मध्ये सुधारणा करणे हे मुख्य उदिष्ट आहे. ि

रसोड शहरातील युवक युवती करिता वाशिमजिल्ह्यात खालील प्रमाणे कंपन्या मध्ये रिक्त जागा असून युवक युवतींना इतर कुठल्याही ठिकाणी अर्ज करता येऊ शकतो.

१. INDIAN OIL CORPORATION LIMITED या कंपनी मध्य Sales Marketing रिक्त जागा २ शैक्षणिक पात्रता १०th

२. BAYER CROPSCIENCE LIMITED या कंपनी मध्ये Sales & Marketing या पदावर रिक्त जागा ३ शैक्षणिक पात्रता १ रींह

३. HDFC BANK LIMITED Sales & Marketing या पदावर रिक्त जागा ८ शैक्षणिक पात्रता Graduation

४. BAJAJ FINANCE LIMITED Sales & Marketing या पदावर रिक्त जागा



४ शैक्षणिक पात्रता Graduation

५. RELIANCE INDUSTRIES LIMITED Sales & Marketing या पदावर रिक्त जागा १ शैक्षणिक पात्रता 12th

६. MEGHA ENGINEERING & INFRASTRUCTURES LIMITED मध्ये

७. Maintenance या पदावर रिक्त जागा ११९ शैक्षणिक पात्रता ITI

या योजनेची पात्रता अर्ज प्रक्रिया व लाभ खालील प्रमाणे आहे.

या योजनेसाठी लाभार्थ्याचे वय २१ ते २४ मध्ये असणे आवश्यक आहे. लाभार्थी १० वी, १२ वी, ITI, पदवीधर इत्यादी शैक्षणिक पात्रता धारण केलेला असावा. इंटर्नशिप कालावधी हा १२ महिन्याचा असेल. इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये प्रती रु. ५,०००/- एवढे मानधन देय असेल, तसेच एकरकमी लाभ रु. ६,०००/- व विमा सुविधा उपलब्ध असेल.

लाभार्थी युवक/युवतीने स्वत: https://pminternship. mca. gov.in/login/ `m website वर जाऊन आपली दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी नोंदणी करावी. नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावे.

यासाठी लागणारी आवश्यक माहिती वरील वेबसाईट वर देण्यात आली आहे, किंवा आपल्या नगरपालिकेतील शहर अभियान व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा. व जास्तीत जास्त युवक युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री सतिश शेवदा मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद रिसोड यांनी केले आहे.

# शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी परीक्षा कालावधी पुढे नेण्याचा निर्णय

मुंबई, दि. २५ : शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठीच शालेय परीक्षांचा कालावधी पुढे नेण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य जगन्नाथ अभ्यंकर यांनी म.वि.प, ९३ अन्वये उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. इयत्ता १ ली ते ५ वी साठी २०० दिवस शाळा चालणे अपेक्षित आहे, तर इयत्ता ६ आणि त्यापुढील वर्गासाठी २२० दिवस शाळा चालणे आवश्यक असल्याचे सांगून मंत्री भुसे म्हणाले की, परीक्षा आधी घेण्यात आल्यास विद्यार्थी परीक्षा संपल्यानंतर शाळेत येत नाहीत, त्यामुळे शिक्षणाचा कालावधी अपुरा राहतो. विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी परीक्षा सकाळी ८:०० ते १०:३० या वेळेत घेतली जाणार आहे.

## सम्पादकीय

# मुंबईच्या तीन प्रमाणवेळा

मुंबईत एकेकाळी तीन प्रमाणवेळा अस्तित्वात होत्या, अगदी १९५५ पर्यंत या प्रमाणवेळा पाळल्या जात होत्या .१८८४ मध्ये अमेरीकेतील वॉशिंग्टन येथे भरलेल्या इंटरनॅशनल मेरीडीअन कॉन्फरन्स मधे भारतामध्ये दोन टाईम झोन निश्चित करण्यात आले. बॉम्बे टाईम झोन (७३ पूर्व रेखांश) व कलकत्ता टाईम झोन (९० पूर्व रेखांश) मुंबई ची वेळ (GMT +४ तास ५१मि.) पुढे ठेवण्यात आली. १९०६ मधे ब्रिटीशांनी भारताच्या बरोबर मधून, अलाहाबाद मधून जाणारे (८२.५ पूर्व रेखावृत्त) प्रमाणवेळ ठरवण्यासाठी निश्चित केले. त्याला IST (INDIAN STANDARD TIME) असे नाव दिले. पण मुंबई आणि कलकत्ता यांनी स्वतःच्या प्रमाणवेळा अनुक्रमे १९५५ आणि १९४८ पर्यंत पाळल्या. ज्यावेळी मुंबई लोकल टाईम ऐवजी IST टाईम पाळावा असा ठराव आला, त्यावेळी लोकमान्य टिळक यांच्या विरुद्ध मुंबई हायकोर्टात बॉम्ब स्फोटाचा खटला चालू होता . लोक त्यावेळी सरकार विरुद्ध प्रचंड खवळलेले होते त्याच वेळी फिरोजशहा मेहता यांनी मुंबई लोकल टाईम ऐवजी IST बदलण्यास मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन मध्ये विरोध केला, त्यामुळे म्युनिसिपल कार्पोरेशनने हा ठराव बासनात गुंडाळून ठेवला. हा लोकल बॉम्बे टाईम मुंबईपासून सायन - माहीम पर्यंत पाळला जायचा. १८७० मध्ये ब्रिटीशांनी 'रेल्वे मिन टाइम ' मद्रासवरुन जाणाऱ्या रेखावृत्तावरुन निश्चित केला. कारण मद्रास हे मुंबई व कलकत्ता या त्यावेळच्या मोठ्या शहरांच्या साधारण मधे येते. तारखाते, मुंबईची उपनगरे ,रेल्वे मधे हा 'मद्रासटाईम' पाळला जायचा. ह्यावेळेत आणि मुंबई लोकल टाईम मधे ३० मिनिटांचा फरक होता. म्हणजे मुंबई शहरातील क्लॉक टॉवरवरील घड्याळ दहा वाजताची वेळ दाखवत असेल तर रेल्वे स्थानकातील घड्याळ साडे दहाची वेळ दाखवत असे. मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर जेम्स फर्ग्युसन (१८८० ते १८८५) यांची देखील या बॉम्बे टाईम आणि रेल्वे टाईम या घोळामुळे दोनदा गाडी चुकली. पुढे १९०६ मधे हा रेल्वे टाईम IST मधे बदलण्यात आला. तरीदेखील हा फरक तसाच राहिला कारण मद्रास टाईम (GMT +५ तास २१ मिनिटे) व IST ( GMT +५ तास ३० मिनिटे) आता हा फरक (३०+९) ३९ मिनीटांचा झाला. तिसरी प्रमाणवेळ म्हणजे ' पोर्ट सिग्नल टाईम ', ही प्रमाणवेळ बंदरातील बोटींसाठी वापरण्यात येत असे. ती नेव्हल डॉकयार्ड, नेव्हल बेसवर उपयोगात आणत. त्यासाठी ' टाईम बॉल ' सिस्टिम वापरत. माझ्या आधीच्या लेखात मी याबद्दल सविस्तर लिहिले आहे. पोर्ट सिग्नल टाईम (GMT+ ५ तास) पुढे असे. बॉम्बे कँसल मधील टाईम बॉल यंत्रणा बहुधा बॉम्बे टाईम दाखवण्यासाठी वापरत असावेत. जँकोब ससून मिल (लालबाग) आता युनायटेड मिल नंबर वन मधे जेव्हा बॉम्बे टाईम ऐवजी IST पाळण्याचे ठरविले आणि सकाळी ०५.३० वाजता त्यांनी घड्याळात ०६.०९ वाजताची वेळ दाखवली त्यावेळी तिथल्या ४५०० कामगारांनी दंगा केला, घड्याळाची तोडफोड आणि संप केला, त्यामुळे मिल मालकाने पुन्हा बॉम्बे टाईमची वेळ पाळण्यास सुरवात केली.पुढे १९५० नंतर मुंबई शहराला जशी उपनगरे जोडली जाऊ लागली, तसा सगळ्या उपनगरातील IST मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनने १९५५ मधे मुंबई शहर व उपनगरांसाठी स्विकारला.

# विश्वनाथ सानप यांना महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार प्रदान




**रिसोड** छोट्याशा गावातून हाताला काम मिळावे म्हणून विश्वनाथ सानप अकोला मध्ये येऊन राहले, काम करत असताना शिक्षणही पूर्ण केले सायन्स फिल्ड मधून ल.ील रींह केले, काय करावे असे काही ठरलेले नसताना सरकारी अधिकारी होण्याची अपेक्षा नितांत होती,मात्र विश्वनाथ सानप आपल्या कार्य कर्तुत्वाने पोलिस विभागात कॉन्स्टेबल झाले, नंतर तलाठी पर्यतचा प्रवास राहला, पुढे ही अनेक संधी आल्या पण मनामध्ये ठरवलेलं स्वप्न म्हणजे अधिकारी वर्ग १ पण ते स्वप्न पूर्ण झाले नसून आपल्यातील जिद्द मेहनत सोडून न देता परिश्रम मेहनत करत राहून तलाठी या पदावर २०१२ मध्ये विराजमान झाले, समाजकारणाचा प्रचंड ध्यास असताना तलाठी या पदाचा राजीनामा देऊन संपूर्ण वेळ हा समाज बांधवासाठी दिला पाहिजे या हेतूने विश्वनाथ जी सानप राजकीय क्षेत्रात सक्रिय होऊन २०१३ ला जिल्हा परिषद सदस्य, २०१६ ला सभापती पदापर्यंत धाव घेऊन आपल्या राजकीय आयुष्यात एक वेगळी ओळख तयार केली, अशा मध्येच रिसोड मालेगाव मतदार संघातून जनतेच्या आग्रहास्तव २०१४ शिवसेना पक्षाकडून विधानसभा निवडणक लढन इलेक्शन लढले ज्यामध्ये अपयश आले, मात्र राजकारणाला व समाजसेवेला विराम न देता, २०१६ ते २०१९ पर्यंत सभापतीपदासाठी सानप कायम होते, असे बरेच आयुष्यात उलट पालट झाली, मात्र या सर्व पार्श्वभूमीवर सानप यांनी लँड डेव्हलपर चा व्यवसाय सुरू ठेवला आणि त्यामुळेच ह्या सर्व गोष्टी करू शकले, पुन्हा एकदा मोठया जोमाने व्यवसायात आले पाहिजे म्हणून लँड डेव्हलपमेंट सोबत विश्वा लॉन्स मंगल कार्यालय हा नवीन उद्योग २०१९ ला तालुका रिसोड ठिकाणी सुरू केला, ज्यामध्ये तालुक्यातील लोकांना सोयी मिळाव्यात या हेतूने प्रयत्न करतच राहून त्याला भरपूर प्रतिसाद मिळत राहला, पुन्हा नवीन काही तरी करावे वाशिम जिल्हातील रिसोड तालुक्यातील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे इच्छा अशी मनापासून सानप यांची इच्छा होती, म्हणून रिसोड तालुक्यातील सर्व विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून ललील विश्वा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल २०२४ ला सुरू केले, सामाजिक बांधिलकी कामाचे सामाजिक राजकीय योगदान बघता शैक्षणिक सामाजिक, राजकीय क्षेत्रात उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले विश्वनाथ सानप यांना यंदाचा भारत सरकार मान्यता प्राप्त शीर्षक महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार २०२५ सिनेमा अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते देण्यात आला, अत्यंत कमी कालावधी मध्ये विश्वनाथ सानप यांनी आपले नावलौकिक केले आहे, त्यांच्या कामाचा आवाका पाहता त्यांना अनेक मान्यवराकडून स्मृतीचिन्हे, पुरस्कार मिळाले आहेत, नाशिक येथील रिसील. इन ग्रुपच्या वतीने सानप यांना महाराष्ट्र उद्योजकता पुरस्काराने गौरवन्यात आल्याने त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे,सोमा वाईन व्हिलेज नाशिक येथे पुरस्कार सोहळा संपन्न झाला, यावेळी समाधान महाजन ऋद्ध डेप्युटी कमिशनर महाराष्ट्र राज्य, इको बँक चे झोनल म्यॅनेजर आमलेश त्रिपाठी, रिसील. इन चे उएज फाउंडर सुधीर पठाडे यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

# रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीची विक्रमी आवक



**रिसोड :** एकीकडे, मार्च मुळे महाराष्ट्रातील बहुतेक भागात कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद आहेत, तर दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन मार्च अखेरीसही कृषी उत्पन्न बाजार समीती सूरू ठेवण्याचा निर्णय रिसोड बाजार समीती ने घेतला आहे. याचा परिणाम असा झाला की रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितित हळदीची विक्रमी आवक झाली. रिसोड बाजार समीती मध्ये नवीन हळदीची आवक सुरू झाली आहे आणि आज, गुरुवारी, हळदीचा लिलाव झाला आहे आणि एकूण ३००० क्विंटलपेक्षा जास्त आवक झाली आहे जी सुरुवातीच्या टप्प्यात एक विक्रम मानला जात आहे. रिसोड कृषी उत्पन्न बाजारात, केवळ रिसोड किंवा वाशिम जिल्ह्यातीलच नाही तर बुलढाणा, जालना, हिंगोली, परभणी, अकोला, यवतमाळ इत्यादी जिल्ह्यांमधूनही शेतकरी आणि व्यापारी त्यांची हळद विकण्यासाठी रिसोडला पोहोचतात. सध्या हळदीला १४००० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे, त्यामुळे शेतकरी समाधानी दिसत आहेत. भविष्यात या किमती वाढतील अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. शेतकऱ्यांकडून येणारा नवीन माल अद्याप मोठ्या प्रमाणात आलेला नाही. सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीत हळदीचा लिलाव फक्त गुरुवारीच होतो. जर आवक अशीच वाढत राहिली, तर बाजार समिति यासाठी एक अतिरिक्त दिवसाची योजना आखत आहे.



*सध्या रिसोड बाजार समितीत हळद मोठ्या प्रमाणात शेतकरी घेउन येत आहे. बाजार समिती शेतकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था व्हावी यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. हळदीची खरेदी चांगली सुरू आहे आणि मिळत असलेल्या भावाबद्दल शेतकरी समाधानी दिसत आहेत.*

*- विष्णुपंत भुतेकर सभापती*



*मार्च महिन्यात अखेरीस ही बाजार समिती सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून गुरुवारी 3000 क्विंटल हळदीची ची नोंद झालेली आहे. आवक वाढीचा अनुमान लक्षात घेता आठवड्यातून दोन दिवस हळद खरेदी करण्याची तयारी बाजार समितीकडून आखली जात आहे.*

*- विजय देशमुख,सचिव*

# रिसोडमध्ये प्रथमच तारांगण निरीक्षण कार्यशाळा



**रिसोड :** स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड येथील भौतिकशास्त्र विभाग आणि आय.क्यू.ए.सी.च्या संयुक्त विद्यमाने, २९ मार्च रोजी तारांगण निरीक्षण कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळा रिसोड शहरात प्रथमच आयोजित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राविषयी एक उत्सुकता व कुतूहल निर्माण करणे व संशोधन वृत्ती वाढविणे हा या कार्यशाळेचा हेतू होता. या कार्यशाळेत, विद्यार्थ्यांना ८ इंच उद-ऊद टेलिस्कोप च्या सहाय्याने रात्रीचे आकाश निरीक्षण करण्याची संधी मिळाली. या टेलिस्कोपने विद्यार्थ्यांना गुरू, ग्रह आणि त्याचे चंद्र, मंगळ ग्रह आणि नक्षत्रांचे निरीक्षण करण्यात मदत केली. कार्यशाळेची प्रस्तावना भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. जितेंद्र बोरसे यांनी केली. विद्यार्थ्यांना खगोलशास्त्रज्ञ डॉ. दीपक जताळे यांनी खगोलीय घटकांची ओळख करून दिली व शास्त्रीय महत्व स्पष्ट केले. त्याचबरोबर टेलिस्कोपला हाताळण्याची माहिती दिली.

तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्रातील महत्त्वाच्या गोष्टी सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उत्सुकता वाढवली आहे. विद्यार्थ्यांना स्पेस सायन्स क्षेत्रातील करिअर संधींबद्दल मार्गदर्शन केले. खगोलशास्त्राचा अनुभव घेण्यासाठी या कार्यशाळेच्या पुढील आवृत्त्यांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. झटाले सोबत आलेले सहकारी श्री. जयेश वरघट आणि श्री. दुर्गेश सापकाल यांनी टेलिस्कोप सेटअप आणि त्याच्या कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष प्रदर्शन करून विद्यार्थ्यांना त्याचे उपयोग कसा करायचा याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव अमित पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड, डॉ. ए. डी. बदर, प्रा. भुषण सावळे उपस्थित होते. कार्यशाळेला रिसोड येथील विद्यार्थी, शिक्षक व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सिद्धार्थ इंगोले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. निखिल उंबरकर केले. (वि. प्र)

# नादुरुस्त रोहित्र ४८ तासात बसवण्याची व्यवस्था

मुंबई, दि. २६ : नादुरुस्त रोहित बसविण्यासाठी ३० ते ४० दिवसांचा कालावधी लागत असल्याच्या तक्रारी येत आहेत. मात्र नादुरुस्त रोहित्र ४८ तासात बसविण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली असल्याचे ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विधानसभेत नियम २९३ अन्वये ठरावाला उत्तर देताना सांगितले. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या, राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून राज्यात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जेचा उपयोग करण्यात येत आहे.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# पॅरामेडिकल अभ्यासक्रमांना 'अच्छे दिन'

## कोरोनानंतर वाढली पॅरामेडिकल क्षेत्रातील मागणी



महाराष्ट्र राज्यातील आरोग्यमंत्री मा.ना.श्री.प्रकाश आबिटकर यांच्या नव्या निर्णयामुळे पॅरामेडिकल अभ्यासक्रमांना 'अच्छे दिन'आले आहेत. डॉक्टरांसोबत काम करण्यासाठी विविध शाखांतील तंत्रज्ञ लागतात.हे तंत्रज्ञ पॅरामेडिकल अभ्यासक्रम पूर्ण केलेले असतात. यामध्ये पदविका,पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रमांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना आपली आवड आणि गरजेनुसार अभ्यासक्रम निवडता येतो. या अभ्यासक्रमांची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याने पॅरामेडिकल अभ्यासक्रमाला आणि ही कौशल्ये आत्मसात केलेल्या मनुष्यबळाला 'अच्छे दिन' आले आहेत. कोरोनानंतर आरोग्यविषयक वेगवेगळ्या प्रकारची कौशल्ये असलेल्या मनुष्यबळाची मागणी वाढली आहे.या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून रुग्णांची काळजी घेता येते. विविध चाचण्या,निदान प्रक्रिया आणि उपचारपद्धतींमध्ये पॅरामेडिकल मनुष्यबळाची भूमिका महत्त्वाची ठरते. त्याबाबतच्या रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. या मनुष्यबळासाठी विविध ठिकाणी जसे की रुग्णालये, क्लिनिक,प्रयोगशाळा,संशोधन संस्था,आरोग्य केंद्रे आणि खासगी वैद्यकीय संस्थांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.तसेच या क्षेत्रात चांगला पगारही मिळतो.अनुभव आणि कौशल्यानुसार पगारात वाढ होते. विविध अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधींमुळे तरुणांसाठी हे क्षेत्र करिअरचा उत्तम पर्याय ठरत आहे.

> • आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डायलिसिस तंत्रज्ञ,ऑपरेशन थिएटर तंत्रज्ञ आदी अभ्यासक्रम बारावीनंतर उपलब्ध आहेत.शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयांतून देखील या प्रकारच्या वैद्यकीय शिक्षणाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यानंतर उमेदवारांना वैद्यकीय महाविद्यालयात,रुग्णालयांत नोकरीचे विविध पर्याय उपलब्ध असतात. देशातही मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रासाठी उत्तम संधी आहेत.
>
> • - सचिन गांजरे
> संचालक जय लखमा डीएमएलटी अँड पॅरामेडिकल कॉलेज,सचिव महाराष्ट्र मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन असोसिएशन






## आ. भावनाताई गवळी यांनी सहपरीवार उभारली गुढी



रिसोड : शिवसेना नेत्या विदर्भ कन्या, महिला उत्कृष्ट प्रतिष्ठान च्या अध्यक्षा तथा आमदार भावनाताई गवळी यांनी त्यांच्या रिसोड येथे निवासस्थानी 'गुढी' उभारून सहपरिवार साजरा केला 'पाडवा.

'गुढी नव्या आशा-उमंगांची, गुढी हिंदू संस्कृतीच्या अभिमानाची..' हा मराठमोळा संदेश देत गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर रिसोड येथील निवासस्थानी रविवार ३० मार्च रोजी आमदार भावनाताई गवळी , मातोश्री शालिनीताई पुंडलिकराव गवळी, साधनाताई गवळी कल्पनाताई गवळी संजनाताई गवळी ,यांनी गुढीची विधिवत पूजा करून हिंदू नववर्षाचे मंगलमय स्वागत केले. यावेळी कुलदीप पाटील यांची उपस्थिती होती. ता.प्र.

## शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धे किरण मोरेचा सन्मान

रिसोड : शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक ञ्चाद निर्मिती स्पर्धा २०२३ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाकोली ता. रिसोड येथे कार्यरत शिक्षिका किरण मोरे यांनी सहभाग घेत विविध शैक्षणिक व्हिडिओ साठी त्यांना डाएट प्राचार्य पुटवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व धनादेश देऊन त्यांचा या कार्यासाठी गौरव करण्यात आला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वाशिम यांचे वतीने शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.. यामध्ये शालेय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करत तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय गटात सहभाग घेऊन विविध सहा विषयांचे शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करून शिक्षिका



किरण मोरे यांनी तालुकास्तरीय प्रथम तर जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावला.. आज जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वाशिम येथे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात शिक्षिका किरण मोरे यांचा प्राचार्य पुटवाड यांचे हस्ते पारितोषिक रक्कम, सन्मानाचिन्ह ,प्रमाणपत्र व धनादेश देऊन गौरव करण्यात आला. सदर स्पर्धेअंतर्गत सहभाग घेत या निवडीबाबत रिसोड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री कोकाटे साहेब व अधिक्षक नायक साहेब यांनी शिक्षिका किरण मोरे यांचे कौतुक केले. श. प्र.

## तहसिलदार तेजनकर यांची जि.प. शाळा निजामपूरला भेट

■ जलतारा प्रकल्प व शंभर दिवस शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत शाळेला भेट देवून शाळेच्या कामकाजाची घेतली माहिती

**रिसोड प्रतिनिधी :** रिसोड तहसीलच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी जलतारा प्रकल्प व शंभर दिवस शासन आपल्या दारी अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा निजामपूरला भेट दिली. त्यांचे समावेत तहसीलचे कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक वर्गात जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासून समाधान व्यक्त केले. शाळेतील डिजिटल व स्मार्ट डिजिटल क्लासरूम बद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली. शाळेतील ग्रंथालय व स्मार्ट डिजिटल क्लासरूम व सायन्स लॅबची तर शाळेतील स्वच्छतागृह आरो प्लांट द्वारे विद्यार्थ्यांना दिले जाणारे पाणीत्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली व जिल्हा परिषदेमध्ये इतक्या उच्च कोटीच्या सोयी दिल्या जातात याबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेतील स्वच्छतागृह, आरो प्लांट द्वारे विद्यार्थ्यांना दिले जाणारे शुद्ध पाणी, खेळ साहित्य, खेळाचे मैदान, प्रत्येक खोलीत लावलेल्या एलईडी व सीसीटीव्ही कॅमेरे, किशोरवयीन मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग मशीन, डिस्ट्रॉयर मशीन इत्यादी बाबी बघून तर त्यांनी सर्वोत्तम सुविधांनी परिपूर्ण अशी आदर्श शाळा म्हणून शाळेचा व मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षकांची त्यांनी स्तुती केली. शाळा व्यवस्थापन समिती तथा शाळेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित गावातील नागरिकांना त्यांनी जलतारा या प्रकल्पाबद्दल माहिती दिली व यामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी गावातील सरपंच उषा किसन जाधव उपसरपंच गोल्हारे, मंडळ अधिकारी नप्ते, केंद्रप्रमुख मेघशाम पत्रे, शिक्षक अरविंद इंगोले,वाबळे,संबळेआदींची उपस्थिती होती. संचलन अर्जुन वरघट यांनी तर आभार प्रदर्शन धीरज जाधव यांनी केले.



## थकीत मानधन द्या, अन्यथा काम बंद आंदोलन..!

### रोजगार सहाय्यक संघटनेचा प्रशासनास ' अल्टिमेटम '




वाशिम : ऑक्टोबर 2024 मध्ये नियोजन ( रोहयो ) विभागाच्या वतीने रोजगार सहाय्यक यांच्या मनाधनाविषयी शासन निर्णय झाला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही. त्यामुळे तब्बल सहा महिने उलटूनही राज्यातील रोजगार सहाय्यकांना कामाचे मानधन मिळालेले नाही. परिणामी काम करूनही सबंधित रोजगार सहाय्यकांवर उपासमारीची वेळ आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या गंभीर बाबीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रोजगार सहाय्यक संघटनेने प्रशासनाकडे निवेदन सादर करून " थकीत मानधन द्या, अन्यथा एक एप्रिल पासून काम बंद आंदोलन छेडण्यात येईल असा ' अल्टिमेटम ' दिला आहे. प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायक संघटनेचे एक एप्रिल २०२५ पासून काम बंद आंदोलनाचे निवेदन सादर करण्यात आले असून रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे, दि. 3 ऑक्टोबर 2024 रोजी नियोजन (रोहयो) विभागाच्या वतीने मानधनाचा शासन निर्णय झाला,परंतु त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही.त्यामुळे तब्बल सहा महिन्यापासून महाराष्ट्रातील रोजगार सहायकांना मानधन मिळालेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या बाबीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्रातील ग्रामरोजगार सहायकांनी संदर्भीय शासन निर्णयानुसार आठ हजार रुपये फिक्स मानधन तात्काळ वयक्तीक खात्यात अदा करण्यात करण्यात यावे तसेच,दोन हजार रुपये प्रवास भत्ता व इतर बाबींकरता मंजूर केलेले शासन निर्णय व अतिरिक्त दोन टक्के प्रोत्साहन भत्ता देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.सदर निर्णयानुसार 3 ऑक्टोबर 2024 च्या निर्णयाची अंमलबजावणी करून फिक्स मानधन वैयक्तिक खात्यात देण्यात यावे. अशा पद्धतीचे निवेदन रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायकांनी रिसोड पंचायत समिती गटविकास अधिकारी ,तहसीलदार रिसोड, कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय रिसोड, यांना सादर करण्यात आले आहे.दिलेल्या सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाने एक एप्रिल 2025 पर्यंत या गंभीर बाबीची दखल घेतली नाही, तर 01 एप्रिल पासून महाराष्ट्रातील सर्व ग्राम रोजगार सहाय्यक काम बंद आंदोलनाचा बडगा उगारणार आहेत. अशा स्वरूपाचे निवेदन रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायकांनी २८ मार्च 2025 रोजी सादर केले आहे. या निवेदनावर रिसोड तालुक्यातील ग्राम रोजगार सहाय्यक नरेंद्र अंभोरे, गजानन काठोळे, गजाननराव बाजड ,अशोक सरकटे,प्रभाकर नाईकवाडे,आत्माराम जाधव, दिपक सरोदे,अनंता सानप,राऊत,भागवत नरवाडे,अमोल देशमुख,राजु थोरात, केशव हागे,सदाशिव कास्टे,गजानन जाधव,पंढरी बोडखे,गणेश सरनाईक,आत्माराम दळवी,अभिमन्यु भगत,आवले,रवी भुतेकर,तुळशिराम साबळे,राजेश शेवाळे, दत्तराव गरकळ,देव्हडे यांच्यासह रिसोड तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सहायक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५'साठी अर्ज आमंत्रित

नवी दिल्ली, २८ : केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयातर्फे 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५' साठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवार १ एप्रिल २०२५ पासून राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर (https://awards.gov.in) ऑनलाईन अर्ज करू शकतात. हा पुरस्कार दरवर्षी देशभरातील असामान्य गुणवत्ताधारक मुलांना (वय वर्षे ५ ते १८) सन्मानित करण्यासाठी प्रदान केला जातो.

शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण आणि कला व संस्कृती या क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी कोणतेही भारतीय नागरिकत्व असलेले व भारतात वास्तव्यास असलेले ५ ते १८ वर्षे वयोगटातील मुले पात्र आहेत. अर्जदार स्वतः अर्ज करू शकतात

तसेच इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेद्वारे त्यांचे नाव नामांकनासाठी सुचवले जाऊ शकते. केंद्रीय मंत्रालयानी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ ठेवली आहे. अधिक माहितीसाठी (https://awards.gov.in) या वेबसाइटला भेट द्यावी. दरवर्षी महिला व बालविकास मंत्रालयातर्फे या पुरस्कारांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये विविध क्षेत्रांत अपवादात्मक कामगिरी करणाऱ्या मुलांना गौरविण्यात येते.